# नियमित फौजदारी खटला क्र. २१२/२०१३ मधील निशाणी ५७ वर आदेश

CNR No.MHAK070007592013

(दिनांक ०६ जुलै, २०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज अभियोग पक्षातर्फे फौजदारी प्रक्रिया संहिता ९१ अन्वये कागदपत्रे दाखल करण्यास आदेशित करणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अभियोग पक्षाचे म्हणणे की, सदर प्रकरणात दिनांक ०३.०९.२००९ रोजीचे पत्र तसेच दिनांक ०९.०५.२००६ रोजीची दारिद्रय रेषेखालील यादी ज्यामध्ये आक्षेप आल्यावर ज्या व्यक्तींची नावे वगळण्यात आली आहे त्यावर श्री. जामोदे यांची सही आहे. सदर दोन्ही दस्त आरोपपत्रासोबत दाखल असून त्यांची सत्यप्रत आहे. सदर दोन्ही दस्तावर सत्यप्रत म्हणून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांची सही आहे. सदर दोन्ही दस्त सिध्द करण्याकरीता मुळ दस्त प्रकरणात दाखल करणे गरजेचे आहे. तरी तपासी अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती, बाळापूर यांना दोन्ही दस्त दाखल करण्यास आदेशित करावे, अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर आरोपीतर्फे म्हणणे दिलेले असून प्रस्तुत अर्जाला प्रखर विरोध नोंदविला आहे. सदरचा अर्ज कायद्याने चालणारा नसून नामंजुर करणेस पात्र आहे. आरोपीच्या कथनानुसार अभियोग पक्षातर्फे गट विकास अधिकारी आणि ग्रामपंचायत सचिव यांना तपासण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरण प्रलंबित करण्याच्या उद्देशाने अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत अर्ज दाखल केलेला असून फेटाळण्यास पात्र आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखानाच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम ४२० व ४०९ अंतर्गत दोषारोप ठेवलेला आहे व एकुण चार साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. दोषारोपपत्राच्या अनुक्रमांक ३० आणि ३३ वर अर्जात नमुद केल्याप्रमाणे पत्र व यादी या दस्तांच्या सत्यप्रती दाखल आहेत. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ९१ मधील तरतुदीप्रमाणे न्यायालयात कोणत्याही चौकशी, संपरीक्षा किंवा अन्य कार्यवाही याच्या प्रयोजनार्थ कोणताही दस्ताऐवज जरुरीचे किंवा इष्ट वाटेल तेव्हा ज्या

व्यक्तीच्या कबज्यात किंवा नियंत्रणाखाली असा दस्तऐवज असेल त्यास न्यायालय समन्स काढून किंवा आदेश पारीत करुन दस्तऐवज हजर करण्यास फर्मावू शकेल. सदर खटल्यातील फिर्याद गट विकास अधिकारी यांनी दिलेली असून प्रस्तुत खटल्यात शासनाच्या रकमेचा अपहार झालेच्या दिसून येत असून शासनाची फसवणुक झालेली आहे. तपासण्यात आलेले सर्व साक्षीदार त्यांच्या पोलीस जबाबावर ठाम आहेत. त्यामुळे सदर दस्त शाबीत झाल्यास प्रस्तुत खटल्यातील अंतिम न्यायनिर्णय करतेवेळी न्यायालयास मदत होणार आहे. सबब, वर नमुद तरतुदीचा अवलंब करुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे तपासी अंमलदार सुरेंद्र जोशी व गट विकास अधिकारी पंचायत समिती बाळापूर यांना त्यांच्या ताब्यात असणारे किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असणारे दस्ताऐवज न्यायालयात दाखल करण्यासाठी आदेशित करणे उपयुक्त होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आ दे श :**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. आदेशात नमुद केल्याप्रमाणे तपासी अंमलदार श्री. सुरेंद्र जोशी व गट विकास अधिकारी पंचायत समिती बाळापूर यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी दिनांक ०३.०९.२००९ रोजीचे पत्र तसेच दिनांक १९.०५.२००६ रोजीची यादी असे दोन्ही दस्त दाखल करावे.

३. संबंधित लिपीकांनी वर नमुद आदेशाप्रमाणे संबंधीत कार्यालयास विहित नमुन्यात पत्र पाठवावे.

Digitally signed by DIPMALA MAHENDRA PATIL
Date: 2023.07.03 19:01:55 +0530

दिनांक : ०६/०७/२०२३.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Date of Decision | :- | 06/07/2023 |
| Order signed by P.O on | :- | 06/07/2023 |
| Order uploaded on | :- | 06/07/2023 |